# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**आदिवासी भागातील शाळेतील विद्यार्थ्यांसाठी खरेदी करण्यात आलेल्या साहीत्याबाबत**

**(१) १९२२२ (३०-११-०००२). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी भागातील शाळेतील विद्यार्थ्यासाठी खरेदी करण्यात आलेले सहित्य, बाजार भावापेक्षा जास्त दराने खरेदी करण्यात आल्याप्रकरणी झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी पुर्ण होईपर्यंत, ठेकेदाराची देयक अदा करण्यात येवू नये असे आदेश आदिवासी विकास विभागाने माहे सप्टेंबर, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार दोषी व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०१-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी आश्रमशाळांमध्ये पुरवठा करण्याच्या ई-टेंडरींग प्रक्रियेबाबत**

**(२) २७७१९ (३०-११-०००२). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी आश्रमशाळांमध्ये दुध, अंडी, केळी, सफरचंद तसेच ऋतुमानानुसार फळांचा पुरवठा करण्याबाबत ई-टेंडरींग प्रक्रियेसाठी राज्यातुन किती निविदा मागविण्यात आल्या होत्या व त्या निविदा स्विकारण्याचे स्वरुप (अटी व नियम) काय होते,

(२) असल्यास, सदर निविदेसाठी किती निविदा प्राप्त झाल्या, त्यापैकी कोणती निविदा मान्य करण्यात आली,

(३) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०१-१०-२०१८) :** (१), (२) व (३) आदिवासी विभागाच्या शासकिय आश्रमशाळांकरिता सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांकरिता दुध, अंडी व ऋतुमानानुसार फळांचा पुरवठा करण्यासाठी अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर, अमरावती, नाशिक व ठाणे यांनी त्यांच्या स्तरावर ई-निविदा प्रक्रिया राबविली होती. सदर निविदा प्रक्रियेसाठी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्या स्तरावरुन अटी व शर्ती निश्चित करुन दिल्या होत्या. तसेच स्थानिक गरजा लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार इतर अटी व शर्ती अपर आयुक्तांनी समाविष्ट कराव्यात अशी त्यांना मुभा देण्यात आली होती.

त्यानुसार सर्व अपर आयुक्तांनी त्यांचे स्तरावर ई निविदा प्रसिध्द करुन न्युनतम दर धारकांचे प्रस्ताव वित्तीय मान्यतेस्तव आयुक्त, आदिवासी विकास यांचे मार्फत शासनास सादर करण्यात आले होते. सदर प्रस्तावांना शासनाने वित्तीय मान्यता प्रदान केली होती. सदर आदेशांना अनुसरुन संबंधित पुरवठा धारकांना निविदेतील अटी व शर्तीनुसार पुरवठा आदेश देण्यात आले होते. त्यानुसार पुरवठा धारकांनी पुरवठा केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जव्हार आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत विद्यार्थी पौष्टीक आहारापासून वंचीत असल्याबाबत**

**(३) ३५५२० (३०-११-०००२). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी आश्रमशाळा वसतीगृहातील विद्यार्थ्यांना मुलभूत सुविधांसह पौष्टिक आहार देण्यात यावा असे उच्च न्यायालयाने सक्त आदेश दिले असताना जव्हार विकास प्रकल्प विभागातील सुमारे १७,८६३ विद्यार्थी हे गेले ६ महिने पौष्टीक आहारापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) आदिवासी विभागाकडून नियमित दिला जाणारा, अंडी, दूध, केळी व सफरचंद यांचा पुरवठा दिंनाक १ ऑगस्ट, २०१५ पासून बंद करण्यात आलेला आहे त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) पौष्टिक आहार योग्य वेळी न मिळाल्यामुळे दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ रोजी जव्हार प्रकल्पांतर्गत आदिवासी विद्यार्थीनींसाठी निवासी आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालय असलेल्या आश्रमशाळेतील इयत्ता ४ थी मध्ये शिकणाऱ्या कु.रासेला तेलम (वय १० वर्षे) या विद्यार्थीनीचा शरीरात रक्ताचे (हिमोग्लोबीन) प्रमाण कमी झाल्याने दुर्दैवाने मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व गंभीर प्रकरणाची शसनाने चौकशी करण्यात येऊन त्यांस जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरूध्द शासनाने कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे तसेच बंद करण्यात आलेला पौष्टीक आहार सुरू करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलेबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०१-१०-२०१८) :** (१) व (२) दि. ७.८.२०१५ ते ९.९.२०१५ या कालावधीत अंडी,केळी सफरचंद यांचा पुरवठा बंद होता त्यानंतर याचा नियमित पुरवठा सुरु झाला. अंडी,केळी बंद कालावधीमध्ये त्यांना मोड आलेली उसळ व इतर पौष्टिक आहार देण्यात येत होता.
(३) इयत्ता ४ थी मध्ये शिकणाऱ्या कु.रासेला तेलम (वय, १० वर्ष) या विदयार्थीनीचा मृत्यु मेंदुच्या आवरणामध्ये रक्तस्त्राव झाल्यामुळे ARACHONOID CYST ची गाठ फुटल्यामुळे झाला आहे, त्याचा सबध पौष्टिक आहाराशी जोडने उचित होणार नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे देवपूरपाडे, ता.देवळा येथील आदिवासी मुलांची आश्रमशाळा स्थलांतराबाबत**

**(४) ४३६९८ (३०-११-०००२). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे देवपूरपाडे, (ता. देवळा जि. नाशिक) येथील भाडे तत्वावर सुरु असलेली आदिवासी मुलांची आश्रमशाळा इमारतीअभावी मालेगाव तालुक्यातील पांढरुण येथे स्थलांतर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय व त्यात काय आढ़ळून आले,
(३) असल्यास, देवपूरपाडे येथे सुरु असलेली परंतु इमारती अभावी स्थलांतरीत करण्यात आलेली शाळा पुन्हा सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१०-१०-२०१८) :** (१), (२) व (३) शासकिय आश्रमशाळा मौजे देवपूरपाडे, ता.देवळा जि.नाशिक ही आश्रमशाळा भाडयाच्या इमारतीत सोई सुविधांचा अभाव असल्याने सदर आश्रमशाळा तात्पुरत्या स्वरुपात शासकिय आश्रमशाळा पांढरुण ता.मालेगाव जि.नाशिक येथे स्थलांतरीत करण्यात आली आहे. शासकिय आश्रमशाळा देवपुरवाडे या आश्रमशाळेस २ हेक्टर गावठाण जागा ग्रामपंचायत महालपाटने यांनी दिली असुन सदर आश्रमशाळा संकुल बांधकामाचे प्रस्ताव प्रशासकिय मान्यतेस्तव सादर करण्यात आले असुन त्यास मान्यता प्राप्त होताच निधीच्या उपलब्धतेनुसार बांधकाम हाती घेण्यात येईल. बांधकाम पुर्ण झाल्यानंतर शाळा मुळगावी सुरु करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासकीय आदिवासी आश्रम शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य पुरविण्याबाबत**

**(५) ५८६५७ (३०-११-०००२). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय आदिवासी आश्रम शाळांमध्ये २ लाख विद्यार्थ्यांना गत वर्षी वहया आणि शालेय साहित्य यापासून वंचित रहावे लागले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक. ४ एप्रिल, २०१६ रोजी १० कोटी रुपयांच्या साहित्य खरेदीच्या निविदा काढूनही अद्याप अंतिम मंजुरी मिळालेली नसल्याची बाब दिनांक ७ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शाळा सुरु होताच विद्यार्थ्यांना वहया आणि शालेय साहित्य तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१०-१०-२०१८) :** (१) निविदा प्रक्रियेदरम्यान तक्रारी प्राप्त झाल्याने सदर निविदा रद्द करुन शासकीय आश्रमशाळांना लेखन सामुग्री व शैक्षणिक साहित्य शासकीय आश्रमशाळेतील मुख्यांध्यापक स्तरावरुन पुरविण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला होता. त्यानुसार साहित्य पुरवठा करण्यात आलेला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे दिनांक ०२.०७.२०१६ रोजी शासन मंजुरी प्राप्त झाली असुन त्यानुसार पुरवठा आदेश दिनांक ०२.०७.२०१६ रोजी देण्यात आले होते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सन २०१६-१७ या शैक्षणिक सत्रात विहीत कालावधीत वहया पुरवठा करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सर्व शासकिय आदिवसी शाळांतील भोजन व्यवस्थेच्या वेळामंध्ये बदल करण्याबाबत**

**(६) ६३३७९ (३०-११-०००२). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शासकिय आदिवासी आश्रमशाळांमध्ये मुलांना देण्यात येणाऱ्या भोजनाच्या अयोग्य वेळांमुळे मुलांना रात्री उपाशी झोपावे लागले आाहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सकाळी १० वाजता व संध्याकाळी ६ वाजता भोजन दिले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अयोग्य वेळांमुळे मुलांच्या आरोग्यावर परिणाम होत असून यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या या भोजनांच्या वेळांमध्ये बदल करण्याबाबत शासनाने काणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१०-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) विदयार्थ्याना सकाळचे जेवण १२.४५ ते १.४५ या दरम्यान व संध्याकाळचे जेवण ७.३० ते ८.३० या दरम्यान वेळेत दिले जाते.
(३)डॉ.सुभाष साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली समितीने केलेल्या शिफारशीस अनुसरुन आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे संध्याकाळचे जेवण व सकाळचा अल्पोपहार यामधील अंतर कमी करणेसाठी शासकीय व अनुदानित आश्रमशाळेच्या शालेय कामकाज, भोजन आणि अल्पोपहाराच्या वेळेत बदल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रामपूर (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथील "रामपूर जंगल कामगार सहकारी संस्था मर्या.," या संस्थेमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(७) ६४१४६ (२२-०८-२०१६). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामपूर, (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथील "रामपूर जंगल कामगार सहकारी संस्था मर्या.," संस्थेमध्ये असलेल्या संचालक मंडळाने मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केला असल्याचे चौकशी अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रामपूर जंगल कामगार सहकारी संस्था मर्या, संस्थेची गैरव्यवहाराची वैधानिक कार्यवाही करुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५ रोजी मा.सहकार व पणन मंत्र्यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.मंत्री महोदयांनी विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांना कारवाईचे निर्देश दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१०-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) रामपूर जंगल कामगार सहकारी संस्थेचे सचिव श्री. संतोष शुक्ला व संस्थेचे अध्यक्ष यांनी संगनमताने करोडो रुपयांचा गैरव्यवहार करुन संस्थेला डबघाईला आणले आहे. याबाबत सखोल चौकशी करुन त्यांचेवर उचित कार्यवाही करण्याबाबत आपल्या स्तरावरुन संबंधीतास आदेश द्यावेत अशी विनंती प्रा.राजू तोडसाम, आमदार-आर्णी विधानसभा यांनी दिनांक १२.०३.२०१५ च्या निवेदनाद्वारे मा. सहकार (मंत्री) यांना केली होती.

(३) प्रा.राजू तोडसाम, आमदार-आर्णी विधानसभा यांनी मा. सहकार (मंत्री) यांना दिलेल्या निवेदनावर मा. मंत्री महोदयांनी सदर बाबत तातडीने योग्य ती चौकशी करणे आवश्यक आहे. असे निर्देश दिले आहेत. त्यानुसार नियमानुसार योग्य ती कार्यवाही करुन मा. आमदार महोदयांना अवगत करण्यात यावे अशा सुचना सहकार आयुक्तालयाकडील दि.०४.०४.२०१५ च्या पत्रान्वये विभागीस सहनिबंध, सहकारी संस्था, अमरावती व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ यांना देण्यात आल्या होत्या.
(४) सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, घाटंजी या कार्यालयामार्फत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये कारवाई प्रस्तावित केलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळमना (जि.नागपूर) येथील परिसरातील शासकीय आदिवासी वसतीगृहातील पाणी समस्येबाबत**

**(८) ६५४२२ (२७-०१-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळमना (जि.नागपूर) येथील परिसरातील शासकीय आदिवासी वसतीगृहात अनेक महिन्यांपासून पाण्याची समस्या सुटत नसल्यामुळे विद्यार्थ्यांनी गिरीपेठ येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय बंद केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या तीन वर्षापासुन खाजगी टँकरने वसतिगृहात पाणीपुरवठा करण्यात येत असून त्यासाठी आदिवासी विकास विभागाने ४० लाख रूपये दिले, असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर वसतीगृहातील कूपनलिकेचे पाणी अपुरे पडत असल्यामुळे “नागपूर कॅटर’ या खाजगी टँकरकडून पाणीपुरवठा करण्यात येत असून दोन महिन्यांपासुन २ लाख ८० हजाराचे बिल न भरल्यामुळे टँकरचाही पुरवठा बंद होण्याची शक्यता निर्माण झाल्याची बाब निदर्शनास आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१०-१०-२०१८) :** (१) आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह कळमना येथे १००० विद्यार्थ्यांसाठी एकूण ३ इमारती असून त्यामध्ये ८५० विद्यार्थी राहतात. वसतिगृहाच्या परिसरामध्ये ५ बोअरवेल असून २ बोअरवेलना पाणी लागले नाही तर उर्वरीत ३ बोअरवेलपैकी १ बोअरवेल बंद पडलेली असल्यामुळे वसतिगृहांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत होता. वसतिगृहाला पाणी पुरवठा कमी होत असल्यामुळे विद्यार्थ्यांनी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर कार्यालय बंद केले होते.

(२) हे खरे नाही.

खाजगी टँकरने वसतिगृहास पाणीपुरवठा करण्यासाठी आत्तापर्यंत रुपये ५,९०,८६२/- इतका खर्च झालेला आहे.

(३) अनुदानाअभावी सदर कालावधीत टँकर पुरवठ्याची देयके अदा करण्यात आली नव्हती. तथापि, निधी प्राप्त झाल्यानंतर देयके अदा करण्यात आलेली आहेत.

(४) नागपूर महानगरपालिका, धरमपेठ यांना कळमना येथे दोन इंची पाईप लाईनचे नळ कनेक्शन मिळणेबाबत तसेच नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांना एक विहिर व दोन बोअरवेलची मागणी करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम मिळण्याबाबत**

**(९) ७६७९५ (२८-११-२०१७). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा परिषदेच्या शाळेतील आदिवासी विभागातील विद्यार्थांची ऑनलाईन नोंदणी न झाल्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची सुमारे साडेतीन कोटी रुपयांचा निधी जिल्हा परिषदेकडेच अखर्चित राहिल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदशर्नास आले व तद्नुसार आदिवासी पूर्व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१०-१०-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरीता सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत रुपये ५४९.४३ लाख एवढी रक्कम मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत ठाणे जिल्हयातील एकूण ४२४३० विद्यार्थ्यांपैकी ४१४६८ विद्यार्थ्यांच्या खात्यावर रुपये ५,१५,२३,५००/- इतकी रक्कम जमा करण्यात आलेली असून उर्वरीत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील शासकीय आश्रमशाळेत विद्यार्थ्यांच्या भोजनासाठी मध्यवर्ती स्वयंपाकगृह उभारण्याबाबत

**(१०) ७६९८६ (२८-०४-२०१७). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)राज्यातील शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना एका तासात ताजे भोजन मिळावे म्हणून मध्यवर्ती स्वयंपाकगृह उभारले जाणार असल्याचे आश्वासन आदिवासी विकास मंत्री यांनी माहे नोव्हेंबर,२०१६ मध्ये वा त्या दरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१०-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) या अतंर्गत २ मध्यवर्ती स्वंयपाकगृहाची उभारणी करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती जिल्हयातील महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीतील शिकाऊ उमेदवारांना २ वर्षाचे अनुभव पत्र देण्याबाबत

**(११) ७७२९३ (२८-०४-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील १) तिवसा उपविभाग २) तिवसा १ विज केंद्र ३) माझरी १ विज केंद्र ४) व-हा विज केंद्र येथील ९ प्रशिक्षणार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीमध्ये शिकाऊ उमेदवार म्हणून २ वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण केले असून या शिकाऊ प्रशिक्षणार्थ्यांना २ वर्षाचे अनुभव पत्र देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि. कंपनी मर्या. (ग्रामीण) अमरावती दिनांक १९ मे २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, २ वर्षे प्रशिक्षण पूर्ण होऊनही अद्यापपर्यंत या प्रशिक्षणार्थ्यांना अनुभव प्रमाणपत्र देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर प्रशिक्षणार्थ्यांना त्याचे २ वर्षाचे अनुभवपत्र देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) वीजतंत्री शिकाऊ उमेदवार म्हणून दोन वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना शिकाऊ उमेदवार म्हणून कार्यकाल पूर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र कार्यकारी अभियंता, महावितरण, ग्रामीण विभाग, अमरावती यांच्या कडून देण्यात आले आहे.

---

**खाजगी व मोठ्या शाळांमधील ३५०० विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेतंर्गत निधी वितरीत करण्याबाबत**

**(१२) ७८१३३ (२१-०४-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील खाजगी व मोठ्या शाळांमधील ३५०० विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेपासून वंचीत ठेवण्यात आले असल्याबाबतची बाब माहे डिंसेबर,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१६-१७ या चालु शैक्षणिक वर्षात आठवी ते दहावी पर्यंतच्या पात्र विद्यार्थ्यांची संख्या १२००० हजार असून त्याकरीता शासनाकडून १ कोटी २० लक्ष रूपयांचा निधी अपेक्षित असताना त्यापैकी ६० टक्के निधी सुध्दा मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचीत राहीलेल्या पात्र विद्यार्थ्यांना त्वरीत शिष्यवृत्तीचा लाभ मिळावा याकरीता समाजकल्याण विभागाद्वारे प्रस्ताव शासनास पाठवूनही निधी वितरीत करण्यात आला नाही, हे ही खरे आहे,

(४) असल्यास, या शाळेतील शिष्यवृत्तीपासून वंचीत राहीलेल्या विद्यार्थ्यांना अद्यापपर्यंत निधी वितरीत न करण्याची कारणे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. राजकुमार बडोले (१०-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

सन २०१६-१७ मध्ये जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांच्यामार्फत सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत आठवी ते दहावी पर्यंतच्या पात्र अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या ८०५९ अर्जापैकी माहे मार्च,२०१७ अखेर ६२१२ व मार्च, २०१७ नंतर १८४७ विद्यार्थ्यांना त्यांच्या आधारसंलग्न बॅन्क खात्यावर शिष्यवृत्ती अदा करण्यात आलेली असून त्यावर रु.८०.०० लाख इतका निधी खर्ची पडलेला आहे. तर विजाभज व विमाप्र प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांच्या ९३०४ अर्जापैकी माहे मार्च,२०१७ अखेर ७८५० व मार्च, २०१७ नंतर १४५४ विद्यार्थ्यांना त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यावर शिष्यवृत्ती अदा करण्यात आलेली असून त्यावर रु.६०.०० लाख इतका निधी खर्ची पडलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अकोला विकास केंद्राअंतर्गत जमिनीचा वाढीव मोबदला देणेबाबत**

**(१३) ७९७९६ (२१-०४-२०१७). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अकोला विकास केंद्रा अंतर्गत जमिनीचा वाढीव मोबदला विहित वेळेत अदा केला नसल्याने दिवाणी न्यायालयाकडून जप्ती वारंट बाजाविण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी विधी सल्लागार अकोला यांना वाढीव मोबदल्याच्या रक्कमेचा धनादेश दिवाणी न्यायालयात जमा करण्यासाठी प्रादेशिक अधिकारी अमरावती यांनी त्यांचे पत्र क्र. मऔविम/प्राकाअ/५३१०/२०१६ दिनांक २०/१०/२०१६ नुसार सुपूर्त केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सदर विधी सल्लागार अकोला यांनी धनादेशाच्या वैध तारखेपर्यंत धनादेश न्यायालयात जमा केले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित विधी सल्लागारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१०-१०-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) सदर विधी सल्लागाराला महामंडळाच्या पॅनलवरुन कमी करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील विविध भागातून इमारतीमध्ये बसविण्यात येणाऱ्या उद्‌वाहनाच्या (लिफ्ट) परवानगीचे अधिकार स्थानिक जिल्हयाच्या ठिकाणी देण्याबाबत**

**(१४) ८४९२२ (०९-०८-२०१७). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण)** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहर वाढत असून त्या ठिकाणी शासनाच्या नियमानूसार होत असलेल्या इमारतींच्या बांधकामाची संख्या वाढत आहे परंतू, अजूनही इमारतीमध्ये बसविण्यात येणाऱ्या उद्‌वाहनाची (लिफ्ट) परवानगी ही मुख्य विद्यूत निरिक्षक, मुंबई यांचेकडून घ्यावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विविध भागातून इमारतीमध्ये बसविण्यात येणाऱ्या उद्‌वाहनाची (लिफ्ट) परवानगी मिळण्याकरिता नागरिकांना व विकासकांना मुंबई येथे यावे लागत असून यामूळे त्यांचा वेळ व पैसा यांचा अपव्यय होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, हा अपव्यय टाळण्यासाठी सदरचे अधिकार स्थानिक जिल्हयाच्या ठिकाणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येतआहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) दिनांक ०२.१०.२०१६ पासून मुख्य विद्‌युत निरीक्षक कार्यालयातर्फे उद्‌वाहन उभारणीस परवानगी व उद्‌वाहन चालविण्याची अनुज्ञप्ती या दोन्ही सेवा, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत "ऑनलाईन" प्रणालीवर कार्यान्वित झालेल्या आहेत. त्यामुळे

नागरिक व विकासक त्यांच्या सोयीने उद्वाहन उभारणीसाठी अथवा अनुज्ञप्तीसाठी कुठूनही ऑनलाईन पध्दतीने अर्ज करुन परवानगी वा अनुज्ञप्ती प्राप्त करु शकतात.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिंचोडी (ता.येवला, जि.नाशिक) औद्योगिक क्षेत्रासाठी पाणी आरक्षित करणेबाबत**

**(१५) ८९१९६ (१८-०८-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिंचोडी (ता.येवला, जि.नाशिक) येथील औद्योगिक क्षेत्रासाठी नांदूरमध्यमेश्वर (ता.निफाड) बंधाऱ्यातून पाणी आरक्षणाबाबत जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता यांनी दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर औद्योगिक क्षेत्रासाठी पाणी आरक्षीत करणेसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१०-१०-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) चिंचोडी ता.येवला, जि.नाशिक येथील औद्योगिक क्षेत्रासाठी नांदूरमध्यमेश्वर (ता.निफाड) बंधाऱ्यातून चिंचोडी ता. येवला या औद्योगिक क्षेत्रासाठी विंचूर औद्योगिक क्षेत्रासाठी मंजूर असलेल्या १.२ द.ल.घ.मी. पाणी आरक्षणातून ०.६० द.ल.ल.घ.मी. इतके पाणी आरक्षण मंजूर शासन पत्र दिनांक ५/४/२०१६ अन्वये मंजूर करण्यात आले आहे. सदरील औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठयाबाबतची कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल येथील अदिवासी वसतीगृहात विद्यार्थ्यांचा साहित्य खरेदीमध्ये झालेली अनियमितता**

**(१६) ९०५०३ (०९-०८-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल येथील अदिवासी वसतीगृहातील विद्यार्थ्यांच्या साहित्य खरेदीमध्ये अनियमितता झाल्याचे दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१०-१०-२०१८) :** (१) आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, पनवेल (जुने) ता. पनवेल जि.रायगड येथील दिनांक १.१२.२०११ ते दिनांक ३१.३.२०१५ या कालावधीचे अंतर्गत लेखा परिक्षण करण्यात आले असता लेखा परिक्षण अहवालामध्ये त्रुटी/आक्षेप आढळून आलेले आहेत.
(२) लेखापरिक्षण अहवालामध्ये काढण्यात आलेल्या त्रुटी बाबत प्रकल्प अधिकारी, पेण, जि.रायगड यांचे कडून अनुपाल अहवाल प्राप्त झाल्यावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आश्रमशाळांतील ३४० मुलांच्या पालकांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(१७) ९३६७८ (०९-०८-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आश्रमशाळांची दुरावस्था सुधारण्याचे आदेश न्यायालयाने वारंवार देऊनही आदिवासी आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेत असतांना मरण पावलेल्या ३४० मुलांच्या पालकांना भरपाई देण्यासाठी शासनाकडे निधी नसल्याचे प्रतिज्ञापत्र शासनाने न्यायालयात सादर केल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी कल्याणासाठी शासनाने विविध योजनांमध्ये मोठया निधीची तरतूद केली असतानाही भरपाई देण्यासाठी निधी उपलब्ध न होण्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१०-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) आवश्यक निधी उपलब्ध आहे.
(३) शासकिय आदिवासी आश्रमशाळेतील विदयार्थी/विदयार्थीनीचा मृत्यु झाल्यास त्याच्या/तिच्या पालकास रु.७५,०००/- इतके सानुग्रह अनुदान देण्यात येत होते आता सदर सानुग्रह अनुदानाची रक्कम दि १९/०६/२०१८ च्या शासन निर्णयान्वये रु.२,००,००० इतकी वाढविण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुरकुंभ (ता.दौंड, जि.पुणे) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे**
**ESIC हॉस्पिटल सुरु करणेबाबत**

**(१८) ९४३०१ (१८-०८-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रांजणगाव व चाकण (जि.पुणे) येथे ESIC हॉस्पिटल सुरु करणेबाबत केंद्रीय उद्योग मंत्री यांनी निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुका दौंड, जिल्हा पुणे येथील संपूर्ण केमिकल झोन असलेल्या कुरकुंभ महा. औद्योगिक विकास महामंडळ येथे ESIC हॉस्पिटल सुरु करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ESIC हॉस्पिटल सुरु करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ०७ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री, उद्योग मंत्री व कामगार कल्याण मंत्री यांचेकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ESIC हॉस्पिटल सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१०-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनास निवेदन सादर केले आहे.

(४) चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. २ मधील सुविधा क्षेत्र क्र.२ मधील सुविधा क्षेत्र क्र. AM -१५/१ व रांजणगाव औद्योगिक क्षेत्रातील सुविधा क्षेत्र क्र. AM ५९ यातील क्षेत्र ESIC हॉस्पीटल करीता राखीव ठेवण्यात आले आहे. लोकप्रतिनिधींची मागणी अध्यक्ष, राज्य कामगार महामंडळ, पुणे यांना प्रादेशिक अधिकारी पुणे स्तरावरून कळविण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून उद्योजकांना देण्यात आलेल्या नोटीसांबाबत

**(१९) ९६६९० (०३-०१-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील औदयोगिक वापरासाठीच्या जमिनींचा वापर काही उद्योजक अवैधरित्या व्यावसायिक वापराकरीता करीत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिक विकास महामंडळाने औदयोगिक वापराचा भूखंड व्यावसायिक वापरासाठी करत असलेल्या सहा शोरुम्सला अंतिम नोटीस बजाविलेल्या आहेत हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, औद्योगिक वापराचा भूखंड विकसीत न केलेल्या उदयोजकांकडून सदरहू भुखंड ताब्यात घेऊन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१०-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) भूखंड औद्योगिक प्रयोजनासाठी वाटप करण्यात आलेले आहेत. तथपि, भूखंडधारक औद्योगिक प्रयोजनाऐवजी अनाधिकृत व्यापारी प्रयोजन करीत आहेत. अशा भूखंडधारकांविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

---

**नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील एमआयडीसी मध्ये असलेल्या शिंगवेतुकाई व वांजोळी या गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(२०) ९८२३५ (०३-०१-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील एमआयडीसी मध्ये असलेल्या शिंगवेतुकाई व वांजोळी या गावांना पिण्यासाठी पाणी मिळावे अशी मागणी ग्रामपंचायतीने वारंवार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीनुसार अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१०-१०-२०१८) :** (१) व (२) अंशतः खरे आहे.
वांजोळी ग्रामपंचायत ता.नेवासा, जि.अहमदनगर यांनी महामंडळाकडे पाणी मागणीबाबत अर्ज केलेला असून याबाबत कार्यवाही सुरू आहे. तसेच शिंगवेतुकाई ग्रामपंचायतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे अद्यापपर्यंत पाणी मागणी केलेली नाही.
(३) जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडील मंजूर टंचाई आराखडयातील उपाययोजनेनुसार पांढरीपूल येथील एम.आय.डी.सी. च्या जलशुध्दीकरण केंद्रावरून २०१६ चे टंचाई कालावधीमध्ये शिंगवेतुकाई, वांजोळी व इतर गावांना आवश्यक तेवढा पाणी पुरवठा टँकरव्दारे करण्यात आलेला आहे. वांजोळी गावाचे मागणीनुसार कायमस्वरूपी पाणीपुरवठा करणेबाबत कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महावितरण, महापारेषण व महानिर्मिती या तिन्ही कंपनीच्या वीज कामगारांच्या निवृत्ती वेतनाबाबत**

**(२१) ९९३३७ (२९-१२-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरण, महापारेषण व महानिर्मिती या तिन्ही कंपनीच्या वीज कामगारांच्या प्रलंबित निवृत्ती वेतन योजनेबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.ऊर्जा मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) या संदर्भात मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दि.१६.११.२०१७ रोजी निवृत्तीवेतन योजनेबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ ठराव क्र. ६२४, दि. ३१.११.१९९६ बाबत योग्य तो निर्णय तीन महिन्यांच्या आत घेण्याबाबतचे आदेश दिले होते. त्यास अनुसरुन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीच्या संचालक मंडळाने "तिन्ही कंपन्यांची सध्याची आर्थिक स्थिती पाहता निवृत्तीवेतन योजना लागू करता येणार नाही. सबब, तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचा निवृत्तीवेतन योजनेसंदर्भातील मंडळ ठराव क्र. ६२४, दि.३१.१२.१९९६ याची अंमलबजावणी करणे शक्य होणार नाही" असा मंडळ ठराव क्र.७१८/२०१८ दि.०६.०२.२०१८ रोजी पारित केला आहे.

---

**आदिवासी विकास विभागाच्या नामांकित इंग्रजी माध्यमाच्या प्रवेशासाठी पालकांची लूट होत असल्याबाबत**

**(२२) १०७१८० (१८-०४-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश मिळण्यासाठी पालकांकडून कनिष्ठ लिपिक श्री. बागुल पैसे घेत असल्याच्या तक्रारी पालकांनी प्रकल्प अधिकारी, जव्हार यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच आदिवासी विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळेत शासनामार्फत मोफत प्रवेश देण्यात येतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रवेशासाठी पालकांना लुबाडणाऱ्या सदर कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१०-१०-२०१८) :** (१) दिनांक ३.११.२०१७ रोजी प्रकल्प अधिकारी, जव्हार यांच्या कार्यालयामध्ये तक्रार/निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांच्या दिनांक २.१२.२०१७ रोजीच्या आदेशान्वये श्री. अशोक दगडु बागुल लिपीक टंकलेखक यांना निलंबित करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औद्योगिक विकास महामंडळाच्या (जि.नाशिक) उद्योग भवन इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

**(२३) १०९५१४ (१९-०४-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औद्योगिक विकासामुळे नाशिकमध्ये कारखान्यांची संख्या वाढली असून उद्योगांना लागणारी कार्यालये एकाच ठिकाणी असण्याकरीता १७ वर्षापुर्वी बांधण्यात आलेल्या उद्योग भवन इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र घेतले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतीबाबत निर्धारित असलेल्या निकषांची पुर्तता करुन देखील प्रमाणपत्र मिळालेले नाही, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त उद्योग भवनाला भोगवटा प्रमाणपत्र न मिळण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसर उद्योग भवनाला भोगवटा प्रमाणपत्र मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१०-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) (३) व (४) उद्योग भवन इमारतीचे अग्निशमन यंत्रणेची कामे निवीदा मंजूरीनंतर माहे ऑगस्ट २०१७ मध्ये पूर्ण करण्यात आले व तदनंतर अग्निशमन कार्यालयाकडून अंतिम ना हरकत अग्निशमन दाखला दिनांक २१/९/२०१७ अन्वये प्राप्त झाला. तसेच वास्तुविशारद यांचे इमारतीचे स्ट्रक्चरल प्रमाणपत्र व बांधकाम पूर्णत्वाचा दाखला व इतर आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून भोगवटा प्रमाणपत्र २४/५/२०१८ अन्वये मंजूर करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव (ता.जि.नाशिक) शहरात वारंवार भारनियमनामुळे विद्यार्थ्यांची तसेच जनतेची होत असलेली गैरसोय**

**(२४) १०९६९० (०४-०४-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (ता.जि.नाशिक) शहरात वारंवार होत असलेल्या भारनियमनामुळे विद्यार्थ्यांची तसेच जनतेची मोठया प्रमाणात गैरसोय होत असून यामुळे जनतेने कंदील मोर्चा काढण्यासाठी संबंधित तहसिलदारांकडे परवानगी मागितली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत अधिक चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-१०-२०१८) :** (१), (२) व (३) दिनांक ३०.१२.२०१७ रोजी ३३/११ के.व्ही.उपकेंद्र आझादनगर येथील १० एम.व्ही.ए.चा पॉवर ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त झाला. दरम्यान ११ के.व्ही. रौनकाबाद, आजमीनगर आणि नजमाबाद या वाहिन्यांचा विद्युत पुरवठा चालू राहण्यासाठी यावर तात्काळ उपाययोजना म्हणून ६ तासांचा नियमित भारनियमन अंमलात आणून दुसऱ्या वाहिनीवर तात्पुरता भार टाकून विद्युत पुरवठा करण्यात आला. महावितरणने तातडीने नादुरुस्त पॉवर ट्रान्सफॉर्मर दिनांक ०३.०१.२०१८ रोजी बदलून सदर वाहिनीचा विद्युत पुरवठा सुरळीत केला.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पंढरपूर (जि.सोलापूर) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळअंतर्गत औद्योगिक वसाहत स्थापन करण्याबाबत

**(२५) १०९७२९ (०४-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील युवकांना रोजगार उपलब्ध होण्याकरिता पंढरपूर शहरालगत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळांतर्गत औद्योगिक वसाहत स्थापन करण्याबाबत स्थानिक व लोकप्रतिनिधी यांनी मागणी केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळांतर्गत औद्योगिक वसाहत स्थापन करण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाकडे अद्यापि प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१०-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) महामंडळामार्फत पंढरपूर तालुक्यातील मौजे भाळवणी येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करणे प्रस्तावित होते. मात्र सदर क्षेत्राकरीता पाण्याचा स्त्रोत उपलब्ध नाही. प्रस्तावित

औद्योगिक क्षेत्राच्या भूसंपादनाची कार्यवाही पाण्याचे आरक्षण प्राप्त झाल्यानंतर करण्याचे उच्चाधिकार समितीने निर्देश दिले होते. त्यानंतर महामंडळाचे प्रस्तावाचे अनुषंगाने नियोजित औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याबाबतचा भुसंपादन प्रस्ताव रद्द करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सर्व उपसासिंचन योजना सौर उर्जेवर आणण्याबाबत**

**(२६) १११२७१ (०४-०४-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व उपसा सिंचन योजना सौर उर्जेवर आणण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात अभ्यास करुन धोरण तयार करण्यासाठी एक समिती गठीत करण्यात यावी अशा प्रकारच्या सूचना मा.उर्जामंत्री यांनी दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास संबंधित अधिका-यांना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा प्रकारची समिती गठीत करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, सदर समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय व त्यानुषंगाने शासनाने कोणता कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) राज्यातील सर्व उपसा सिंचन योजना सौर ऊर्जेवर आणण्यासाठी धोरण निश्चिती करण्यासाठी ऊर्जा विभागाने दि.६ फेब्रुवारी, २०१८ च्या शासन निर्णयान्वये महासंचालक, महाऊर्जा यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे.

त्याचप्रमाणे जलसंपदा विभागाने शासन निर्णय दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ अन्वये कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे.

सदर समितीमार्फत राज्यातील सर्व उपसा सिंचना योजना सौर ऊर्जेवर कार्यान्वित करणेबाबत सर्व समावेशक धोरण तयार करणेकरिता कामकाज सुरू असून शासनास ठोस शिफारशी करण्याबाबत अहवाल सादर करण्याची कार्यवाही समितीच्या स्तरावरून सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**वाल्मिकी, म्हैतर व अनुसुचित जाती व्यतिरिक्त अन्य जातीतील सफाई कामगारांच्या वारसांना सेवेत घेण्याबाबत**

**(२७) १११५९० (१९-०४-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सफाई कामगारांच्या वारसांना सेवेत घेण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ११ मार्च, २०१६ रोजीच्या शासन निर्णयामध्ये केवळ वाल्मिकी, म्हैतर व अनुसुचित जातीमधील सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसास किंवा नातेवाईकास वारसा हक्काचा लाभ देण्यात यावा असे नमुद केल्यामुळे अन्य जातीतील सफाई कर्मचाऱ्यांवर अन्याय झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाल्मिकी, म्हैतर व अनुसुचित जातीमधील कर्मचाऱ्यांशिवाय अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इ.मा.व. व वि.मा.प्रवर्गातील तसेच खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना सुध्दा वारसा हक्कानुसार सेवेचा लाभ अनुज्ञेय करण्यासाठी सदर शासन निर्णयाचा फेरविचार करण्याची मागणी कोल्हापुर जिल्हा नगरपालिका कर्मचारी संघासह विविध संघटनांनी शासनाकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१०-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) सदर मागणीबाबत तपासणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण पश्चिम (जि.ठाणे) येथील शासकीय आदिवासी विद्यार्थी वसतीगृहातील वॉर्डनबाबत**

**(२८) ११२०३४ (२१-०४-२०१८). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण पश्चिम (जी.ठाणे) येथील शासकीय आदिवासी विद्यार्थी वसतीगृह आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतिगृहाचे वॉर्डन हे कल्याण मध्येच वास्तव करीत असताना देखील वसतीगृहात येत नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी वॉर्डनविरुद्ध तक्रार केली असून त्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने वॉर्डनविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१०-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) आदिवासी मुलांचे शासकिय वसतिगृह, कल्याण, जि.ठाणे यांनी दिनांक ३०.१.२०१८ व दिनांक १६.३.२०१८ रोजी प्रकल्प कार्यालय शहापूर यांच्याकडे श्री.टिके, गृहपाल यांच्याविरुध्द निवेदन दिले आहे. सदर निवेदनाच्या अनुषंगाने प्रकल्प अधिकारी, शहापूर यांनी श्री.टिके यांची बदली प्रस्तावित केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील दलित वस्त्यांच्या विकासासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सुरु करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(२९) ११२४२५ (२१-०४-२०१८). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दलित वस्त्यांच्या विकासासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रस्तावित योजनेबाबत निर्णय घेण्यासाठी मा.महसूल मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,
(४) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने सामाजिक विकास योजना सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१५-१०-२०१८) :** (१), (२), (३) व (४) शासन निर्णय, दिनांक ०९ मार्च,२०१८ अन्वये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०१८-१९ या वर्षापासून राबविण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महावितरन कंपनी (जि.नांदेड) येथील अभियंत्यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(३०) ११२९९९ (०४-०४-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात विजेची बिले कमी करणे, विज जोडणीसाठी पैशाची मागणी करणे तसेच इतर गैरव्यवहारांप्रकरणी महावितरण कंपनी, नांदेड येथील दोन सहायक अभियंता यांना निलंबित करण्याचे आदेश मा.उर्जा मंत्री यांनी मुख्य अभियंता, महावितरण, नांदेड यांना दिनांक ३० जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मंत्री महोदयांनी निलंबनाचे आदेश देवूनही गैरव्यवहार करणाऱ्या दोघा अभियंत्यांना अद्यापही निलंबित करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गैरव्यवहाराचे आरोप असणाऱ्या सहायक अभियंता तसेच निलंबनाचे आदेश दिल्यानंतरही कारवाई करण्यास बिलंब लावणाऱ्या मुख्य अभियंता यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-१०-२०१८) :** (१) व (२) महावितरण कंपनीचे संबंधित सहायक अभियंता यांना निलंबित करण्याचे आदेश मुख्य अभियंता, महावितरण, नांदेड यांना दि. ३० जून, २०१७ नांदेड येथे वीज ग्राहकांच्या तक्रारींचे थेट निराकरण करण्यासाठी आयोजित केलेल्या जनता दरबाराच्या कार्यक्रमात दिले होते.

परंतु नंतर या प्रकरणी सादर झालेल्या वस्तुनिष्ठ अहवाल विचारात घेऊन, संबंधित अभियंता यांच्या निलंबनाऐवजी त्यांच्या दोन वार्षिक वेतनवाढी संचयी परिणामासह रोखण्याची कारवाई करण्यात यावी असे आदेशित करुन, त्यांच्याकडून प्रकरणाचा वस्तुनिष्ठ अहवाल घेऊन प्रकरण निकाली काढण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार महावितरणकडून शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येऊन दोन वार्षिक वेतनवाढी संचयी परिणामासह रोखण्यासाठी संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. तदनंतर संबंधित सहायक अभियंता यांनी दि. १५.०७.२०१७ रोजी सादर केलेला खुलासा विचारात घेऊन व प्रकरणाची शहानिशा करुन, मुख्य अभियंता तथा सक्षम अधिकारी यांनी त्यांच्या दि. २०.१२.२०१७ च्या पत्रान्वये संबंधित सहायक अभियंता यांना सक्त ताकीद देऊन सदर प्रकरण निकाली काढले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आरमोरी (जि.गडचिरोली) तालुक्यातील संपूर्ण सहकारी संस्थांची तपासणी करण्याबाबत**

**(३१) ११३२८२ (२३-०४-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील मजूर सहकारी संस्थेची योग्य तपासणी न करता मजूर सहकारी संस्थेला कामे देण्यास शिफारस करणारे जिल्हा उपनिबंधक गडचिरोली यांचेवर तात्काळ निलंबनाची कार्यवाही करून तात्काळ अहवाल सादर करावे असे निर्देश अपर निबंधक (सर्वसाधारण) सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांनी जा.क्र.१६-स.आ./मजूर/तक्रार अर्ज/श्री दिलीप घोडांम/२०१७ दिंनाक १९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास विभागीय निबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक गडचिरोली यांना अद्यापही निलंबित करण्यात आले नसून त्यांच्याविरुध्द कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, श्री.दिलीप घोडाम यांनी आरमोरी तालूक्यातील मजूर सहकारी संस्थाचे कामाबद्दल व दयावयाच्या मंजूरीबद्दल दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्याकडे लेखी तक्रार केली होती, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१५-१०-२०१८) :** (१) नाही.

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयाने श्री. दिलीप घोडाम यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करून अहवाल सादर करण्याकरिता विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना कळविले होते.
(२) लागू नाही.
(३) व (४) होय, हे खरे आहे.

सदर तक्रारीबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, गडचिरोली यांच्या कार्यालयाकडून चौकशी करण्यात आलेली असून, तक्रारीत तथ्य नसल्याने कार्यवाही करणे योग्य होणार नसल्याबाबत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## घुग्घूस (जि.चंद्रपूर) येथील लायड स्टिल मेटलमध्ये अग्निसुरक्षेचा परवाना नसतांनाही उत्पादन सुरू असल्याबाबत

**(३२) ११३४४४ (२३-०४-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घुग्घूस (जि.चंद्रपूर) येथील लायड स्टिल मेटल्स या उद्योगाकडे अग्निसुरक्षेची परवानगी नसतांना गत् अनेक वर्षापासून कारखाना सुरू असल्यामुळे सदर उद्योगाच्या व्यवस्थापनाला नागपूर येथील विभागीय अग्निसुरक्षा अधिकाऱ्यांनी नोटीस बजावली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, घुग्घूस येथे सुरू असलेल्या लायड स्टिल मेटल्स या कारखान्याने तात्पुरता अग्निसुरक्षा परवाना घेतला असून त्याचे नुतनीकरण तसेच नविन परवाना घेतला नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१५-१०-२०१८) :**(१) व (२) हे खरे आहे.

सदर कारखाना सन १९९६ पासून कार्यरत असून सदर कारखान्याने नवीन प्रस्तावित इमारतीकरिता सन २०१२ मध्ये तात्पुरत्या ना-हरकत प्रमाणपत्राची विनंती केली होती. सदर कारखान्यास सन २०१२ मध्ये ३१४९२.५२३ चौ.मी. अतिरिक्त बांधकामा-करिता तात्पुरते ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे. सदर तात्पुरत्या ना-हरकत प्रमाणपत्रामध्ये सुचविलेल्या अग्निप्रतिबंधक उपाययोजनांची पुर्तता न केल्यामुळे सदर कारखान्यास दिनाक २२/१२/२०१७ च्या पत्रानुसार विभागीय अग्निशमन अधिकारी नागपूर यांनी नोटीस बजावली.

(३) व (४) सदर कारखान्याने त्यांच्या दिनांक २०/०३/२०१८ च्या पत्रान्वये तात्पुरत्या ना-हरकत प्रमाणपत्रामध्ये सुचविलेल्या अग्निप्रतिबंधक उपाययोजनांची पुर्तता करण्याची कार्यवाही सुरु केली आहे. तसेच दिनांक २८/०६/२०१८ च्या पत्रान्वये सदर कारखान्याच्या आर्थिक अडचणीमुळे त्यांनी ३ ते ४ महिन्याचा अतिरिक्त कालावधी मिळणेबाबत MIDC च्या अग्निशमन विभागास विनंती केलेली आहे.

---

**राज्यातील महावितरण, महापारेषण व महानिर्मितीमधील**
**कंत्राटी कामगारांना वेतन मिळण्याबाबत**

**(३३) ११३९५० (०४-०४-२०१८). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरण, महापारेषण व महानिर्मितीमधील कंत्राटी कामगारांनी दिलेल्या निवेदनातील कोणकोणत्या मागण्या शासनाने आतापर्यंत मान्य केल्या आहेत,

(२) तसेच सदर तिन्ही कंपन्याकडे कार्यरत असलेल्या कंत्राटदारापैकी कोणकोणत्या कंत्राटदारांनी किती कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन अदा केलेले नाही त्याची कारणे काय आहेत तसेच एकूण किती महिन्यांचे वेतन अदा केलेले नाही ,

(३) असल्यास, कामगारांचे वेतन अदा न करणाऱ्या सदर कंत्राटदाराचा ठेका केव्हा रद्द करण्यात आला आहे तसेच त्यांना काळया यादीत टाकण्यात आले आहे काय ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-१०-२०१८) :** (१) महावितरण, महानिर्मिती व महापारेषण या तिन्ही कंपनी मधील कंत्राटी कामगारांचे वेतन त्यांच्या बँक खात्यात वेळेवर जमा करणे, कंत्राटी कामगारांना किमान वेतन देणे, कायद्यानुसार बोनस देणे तसेच, विविध अधिनियमांच्या अधीन राहून किमान वेतन व आनुषंगिक भत्ते देणे, संविधानिक देणीच्या रक्कमा, दायित्वाच्या रक्कमा शासकीय खात्यामध्ये जमा करणे, इत्यादी मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत.

(२)महावितरण, महानिर्मिती व महापारेषण कंपनी मधील बाहयस्त्रोताद्वारे कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांना कंत्राटदारामार्फत त्यांचे मासिक वेतन दरमहा अदा करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तिवसा (जि.अमरावती) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) येथील शिकावू उमेदवारांना वाढीव विद्यावेतन देणेबाबत**

**(३४) ११५६५५ (०४-०४-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) येथील माहे ऑक्टोंबर, २०१३ ते माहे ऑक्टोंबर, २०१५ या कालावधीत औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) येथील शिकावू उमेदवारांना भारत सरकारचे राजपत्रानुसार दिनांक २२ सप्टेंबर, २०१४ रोजीच्या वाढीव दराने विद्यावेतन मिळाले नसल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी, अमरावती (ग्रामीण) यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, त्यानुसार शिकाऊ उमेदवारांना वाढीव वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) महावितरण कंपनीच्या अमरावती ग्रामीण विभागांतर्गत तिवसा उपविभाग येथे कार्यरत असलेल्या शिकाऊ उमेदवारांना दि. २२.०९.२०१४ ते दि.१५.०२.२०१६ या थकित कालावधीचे विद्यावेतन देण्यात आले आहे.

---

**खेड (जि.पुणे) तालुक्यातील येथील संपादित खेड विशेष आर्थिक क्षेत्र वगळण्याबाबत**

**(३५) ११५८२५ (१९-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील खेड विशेष आर्थिक क्षेत्र टप्पा क्र.२ मध्ये मौजे पूर, चौधरवाडी, गोसासी, वाफगाव, पाबळ, रेटवडी व वरुडे या ७ गावांचा समावेश करण्यात आला होता परंतु भूधारकांच्या तीव्र विरोधामुळे ७ गावातील संपूर्ण क्षेत्र वगळण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तावाबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ च्या प्रकरण ६ नुसार ३२ (१) बाबत तपासणी करण्यात येत असून ७/१२ उताऱ्यावरील क्षेत्र, आकारबंद नोंदवही यानुसार क्षेत्रमेळ घेण्यात येत असून क्षेत्रमेळाचे अवलोकन करुन प्रस्ताव फेरसादर करुन क्षेत्र विनाअधिसूचित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास शासनाने मंजुरी दिली आहे काय, तसेच क्षेत्र विनाअधिसूचित करण्याबाबतची अधिसूचना काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१५-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) उद्योग विभागामार्फत जमीनी गैरअधिसूचीत करण्यासंदर्भातील घेतलेल्या निर्णयांची तपासणी व छाननी करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने श्री.के.पी. बक्षी, निवृत्त अपर मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमलेली होती. सदर समितीच्या शिफारसीनुसार जमीनी अधिसूचीत करणे व विना अधिसूचीत करण्याबाबत निकष तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर व जिल्हा प्रशासन, चंद्रपूर यांच्या सहकार्याने "मिशन शौर्य" ची आखणी करण्यात आल्याबाबत**

**(३६) ११७२३९ (२६-०७-२०१८). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर व जिल्हा प्रशासन, चंद्रपूर यांच्या सहकार्याने आदिवासी विद्यार्थ्यांतील नैसर्गिक धाडसीपणाला उत्तेजन मिळण्यासाठी "मिशन शौर्य" ची आखणी करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातील ४ आदिवासी विद्यार्थ्यांनी माऊंट एव्हरेस्ट हे सर्वोच्च शिखर सर केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विद्यार्थ्यांचा शासनाकडून गुणगौरव करुन त्यांना प्रशस्तिपत्रके देऊन त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, याअनुषंगाने निर्णयात्मक कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा (१५-१०-२०१८) :** (१), (२), (३) व (४) "मिशन शौर्य" अंतर्गत शासकीय आदिवासी आश्रमशाळा बोर्डा, देवाडा व जिवती जि.चंद्रपूर येथील अंतीम निवड झालेले दहा विद्यार्थी माऊंट एव्हरेस्ट शिखर सर करण्यासाठी दि.१० एप्रिल, २०१८ रोजी मुंबई येथून शुभेच्छांसह रवाना झाले होते. सदर १० विद्यार्थ्यापैकी ५ विद्यार्थ्यांनी दि.१६ मे व १७ मे, २०१८ रोजी एव्हरेस्ट शिखर सर करण्याची धाडसी मोहिम पुर्ण केलेली आहे. सदर प्रशिक्षणासाठी निधी आदिवासी विकास विभागामार्फत देण्यात आला होता.

सदर यशाच्या गौरवार्थ विशेष बाब म्हणुन संबंधित विद्यार्थ्यांना मा.मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते बक्षीस व प्रशस्तीपत्रक देण्यात आले आहे. तसेच सदर विद्यार्थ्यांचा मा.राष्ट्रपती महोदय, मा.पंतप्रधान महोदय, मा.राज्यपाल महोदय, महाराष्ट्र राज्य, यांच्या हस्तेही गुणगौरव करण्यात आला आहे.

---

## महानिर्मितीच्या प्रकल्पातील कोळशाचा साठा अल्प असल्याबाबत

**(३७) ११७३६१ (२७-०७-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विजेची मागणी वाढत असल्याने ती पूर्ण करण्याऱ्या महानिर्मितीच्या प्रकल्पांतील कोळशाचा साठा अल्प असल्याचे माहे मे २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोळशाच्या साठ्याची ही स्थिती आणखी खालावल्यास काही वीजनिर्मिती संच बंद करण्याचीही वेळ महानिर्मितीवर येऊ शकते हे ही खरे आहे काय?
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणत्या उपाययोजना वा करण्यात येत आहे?
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-१०-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

कोळसा मागणी पत्रानुसार (order booking programme) कोळसा कंपन्यांकडून पुरेसा कोळसा पुरवठा न झाल्यामुळे, माहे जून-२०१६ पासून कोळसा साठा खालावत आहे.

औष्णिक विद्युत केंद्रांना नियमित कोळसा पुरवठयासाठी, महानिर्मिती कंपनीने केंद्र शासनाच्या अखत्यारीतील कोल इंडिया लि.या कंपनीच्या उपकंपन्या WCL, MCL, SECL, आणि सिंगारेनी कोल कंपनी (SCCL) यांच्याशी दीर्घकालीन इंधन पुरवठा करार केलेले आहेत.

कोळसा पुरवठा नियोजनासाठी महानिर्मितीकडून कोळसा कंपन्यांना प्रत्येक पुढील महिन्यासाठी आगाऊ कोळसा मागणी पत्र (order booking programme)दिले जाते.

औष्णिक विद्युत केंद्रातील कोळसा साठा व कोळसा पुरवठा वाढीसाठी महानिर्मितीद्वारे कोळसा कंपन्या, केन्द्रीय विद्युत प्राधिकरण (CEA),नवी दिल्ली यांचेसोबत सातत्याने पत्रव्यवहार व पाठपुरावा केला जातो.

केंद्र शासनाच्या अखत्यारीतील कोळसा कंपन्या व रेल्वे यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून कोळसा रेक्सची संख्या वाढवून दिल्याने कोळसा पुरवठ्यात आणखी सुधारणा झाली.

(२) कोळसा साठा व कोळसा पुरवठा सुधारणेसाठी कोळसा कंपन्या तसेच केन्द्रीय विद्युत प्राधिकरण (CEA) नवी दिल्ली यांचेसोबत महानिर्मिती व शासन स्तरावर सातत्याने पत्रव्यवहार व पाठपुरावा केला जातो. त्यामुळे कोळसा साठयात हळूहळू सुधारणा होणे अपेक्षित आहे, जेणे करून कोळशा अभावी विज निर्मिती संच बंद होणार नाहीत.

(३) औष्णिक विद्युत केंद्रांना नियमित कोळसा पुरवठा होण्यासाठी महानिर्मिती कंपनी व शासन स्तरावर विविध उपाययोजना करण्यात आल्या.

अध्यक्ष, कोल इंडिया लि., सदस्य (वाहतूक) रेल्वे, संचालक (पणन)- डब्लू.सी.एल. व कोल इंडिया लि., अतिरिक्त सचिव व सचिव केंद्रीय कोळसा मंत्रालय, केंद्रीय विद्युत प्राधिकरण (CEA) - उपगट समिती तसेच मा..मुख्यमंत्री महाराष्ट्र यांचेसोबत, केंद्रीय कोळसा मंत्रालय, कोल इंडिया लि., केंद्रीय विद्युत प्राधिकरण, रेल्वेज यांचे वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत विविध बैठका घेण्यात आल्यामुळे कोळशाच्या पुरवठयात सुधारणा झालेली आहे.

• महानिर्मिती कंपनीने WCL आणि SCCL या कोळसा कंपन्यांसोबत सध्याच्या इंधन पुरवठा कराराखेरीज सन २०१८-१९ मध्ये प्रत्येकी १५ लक्ष मे.टन कोळसा घेण्यासाठी सामंजस्य करार केले आहेत व त्यानुसार कोळसा पुरवठा सुरु आहे.

कोळशाचा तुटवडा भरून काढण्यासाठी महानिर्मितीच्या जुन्या संचांचे (Old decommissioned Units) ४.२२९ द.ल.मे.टन इतक्या कोल लिंकेजचे कोराडी विस्तारित प्रकल्पाकडे (३ x ६६० मे.वॅट -Super critical Units) हस्तांतरण करण्यासाठी संयुक्त सचिव, केंद्रीय कोळसा मंत्रालय यांना विनंती केली आहे.

महानिर्मिती कंपनीने केंद्रीय कोळसा मंत्रालयास, कोराडी औष्णिक विद्युत केंद्र (३ x ६६० मे.वॅट), चंद्रपूर (२ x ५०० मे.वॅट) आणि परळी (१ x २५० मे.वॅट) या संचांसाठीच्या सध्याच्या ब्रिज लिंकेजला वाढीव कोळसा मात्रेसह पुढील ३ वर्षासाठी (सन २०२१ पर्यंत) मुदत वाढ देण्याची विनंती केली आहे.

कोळसा पुरवठा वाढीसाठी कोळसा कंपन्या व केन्द्रीय विद्युत प्राधिकरण (CEA) नवी दिल्ली यांचेसोबत महानिर्मिती व शासन स्तरावर सातत्याने पत्रव्यवहार व पाठपुरावा सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील कारखान्यांत अग्निसुरक्षा यंत्रणा स्थापित करण्याबाबत**

**(३८) ११७६८८ (०२-०८-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील विविध भागात शेकडो कारखाने असून या कारखान्यांत कोणतीही अग्निसुरक्षा यंत्रणा नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुषंगाने सदर कारखान्यांत अग्निसुरक्षा यंत्रणा स्थापित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१५-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) कारखान्याच्या अग्नि सुरिक्षततेसाठी महामंडळाच्या विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ च्या तरतूदीनुसार व राष्ट्रीय इमारत बांधकाम संहितेच्या खंड ४ नुसार किमान अग्निसुरक्षा यंत्रणा सुचविली जाते व ती पुर्ण केल्याची खात्री झाल्यावर महामंडळाच्या अधिकार क्षेत्रातील कारखान्यास अंतिम ना हरकत प्रमाणपत्र प्रदान केले जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील बहुसंख्य तालुक्यात शासकीय वसतीगृहाच्या विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता वाढविणेबाबत**

**(३९) ११८७४८ (२६-०७-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात आदिवासी समाज मोठया प्रमाणात असल्याने आदिवासी मुला-मुलींची ३ वसतीगृहे असून प्रत्येकी विद्यार्थी क्षमता फक्त ७५ असल्याने या शासकीय वसतीगृहाच्या विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता वाढविणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास आदिवासी विकास मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१५-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरीता राज्यात एकूण ४९१ शासकीय वसतीगृहे कार्यरत आहेत. सदर वसतीगृहांची प्रवेश क्षमता ५८४९५ इतकी आहे. मागील तीन शैक्षणिक वर्षात वसतीगृह प्रवेशासाठी उपलब्ध क्षमतेपेक्षा अतिरिक्त मागणी पाहता आयुक्त, आदिवासी विकास यांच्याकडून कार्यरत असलेल्या शासकीय वसतीगृहांची साधारणत: २०,००० विद्यार्थी क्षमता वाढविण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला होता.

तथापि, वाढीव क्षमतेकरीता वसतीगृह बांधकामास जागा मिळविणे, वसतीगृह बांधकाम करणे किंवा इमारत भाड्याने उपलब्ध करणे, वसतीगृहाच्या व्यवस्थापनासाठी कर्मचारी नियुक्ती इ.करीता लागणारा विलंब व भांडवली खर्च टाळून शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण (DBT) धोरणानुसार विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट रक्कम जमा करण्याबाबत मंत्रीमंडळाच्या मान्यतेने दि.१५.१०.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजना सुरू करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महामार्गालगतची बंद झालेली सुमारे ३००० दारूची दुकाने पुन्हा सुरू झाल्याबाबत**

**(४०) ११८९७१ (२७-०७-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर बंद झालेली महामार्गालगतची सुमारे ३००० दारूची दुकाने पुन्हा सुरू करण्यास परवानगी देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, या निर्णयामुळे पुन्हा एकदा राज्यभर महामार्गांवर दारू विक्री वाढून अपघाताचे प्रमाण वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार महामार्गानजीकच्या मद्य विक्री अनुज्ञप्त्यां सुरु करण्यास शासनाने निर्णय घेतला आहे.

(२) नाही, सदर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शासनाने निकष ठरवुन निर्णय घेतला आहे. त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढेल असे म्हणता येणार नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दर्यापूर (जि.अमरावती) तालुक्यातील नाफेड खरेदीची अधिकृत एजंट म्हणून काम करणाऱ्या खरेदी-विक्री संघात धान्य खरेदी करतेवेळी गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(४१) ११९८८८ (२६-०७-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दर्यापूर (जि.अमरावती) तालुक्यातील नाफेड खरेदीची अधिकृत एजंट म्हणून काम करणाऱ्या खरेदी-विक्री संघात सन २०१६-१७ मध्ये धान्य खरेदी करतेवेळी शेतकऱ्यांच्या धान्यामधून अनधिकृतपणे काढण्यात आलेल्या नमुन्यात (सॅम्पल) शेकडो क्विंटलचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप खरेदी-विक्री संघाचे उपाध्यक्ष यांनी केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१५-१०-२०१८) :** (१) अशा आशयाची बातमी दैनिक देशोन्नती वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे. यासंदर्भात क्षेत्रीय कार्यालयात कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) हंगाम २०१६-१७ मध्ये किमत स्थिरता निधी योजनेंतर्गत खरेदी करताना नाफेडच्या सर्वेअरमार्फत लॅब व रिपोर्टकरिता अंदाजे २०० ग्रॅम तूरीचे सॅम्पल(नमूना) निवडक शेतकऱ्यांचे घेऊन खरेदी संपताना गोदामामध्ये जमा करण्यात आले आहे. तद्नंतर PSS व बाजार हस्तक्षेप योजनेंतर्गत लॅब प्रतिनिधी नसल्याने तूरीचे सॅम्पल (नमूना) घेतले नाहीत.

तसेच यासंदर्भात संस्थेने खरेदी केलेली तूर व गोदामात जमा केलेली तूर यांचा आढावा घेऊन वृत्तपत्रातील बातमी चुकीची असल्याचे संस्थेने मान्य केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**किन्हवलीतील (जि.ठाणे) अति उच्चदाबाची वीजवाहिनी अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतातून नेल्याबाबत**

**(४२) १२००९६ (२८-०७-२०१८). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किन्हवलीतील (जि.ठाणे) एका स्टोन क्रशरला हानी पोचू नये यासाठी वीज पारेषण कंपनीची अतिउच्चदाबाची वीजवाहिनी अल्पभूधारक शेतकरी श्री.अनंत सोनार यांच्या शेतातून बळजबरीने नेली जात असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असल्यामुळे त्यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदन सादर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्या अनुषंगाने शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-१०-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) महापारेषण कंपनीतर्फे ४०० के.व्ही. कुडूस उपकेंद्रासाठी बाभळेश्वर (जि.अहमदनगर) ते कुडूस (जि.पालघर) ४०० के.व्ही. अशी २३० कि.मी.व्दिपथ वाहिनी उभारण्यात येत आहे.महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनीकडून प्राप्त माहितीनुसार सदर वाहिनीचे काम सन २०११ पासून सर्व नियमांचे पालन करुन, मंजूर प्रोफाईल व मंजूर मार्ग नकाशानुसार सुरु आहे. तसेच सदर वाहिनीचा कोणताही मनोरा श्री.अनंत हरीभाऊ सोनार यांच्या प्रत्यक्ष शेतात उभारण्यात आलेला नसून मनोरा क्र.६९ ते ७० यांना जोडणाऱ्या वाहिनीची तार त्यांच्या शेतातून जाणार आहे.

श्री.अनंत हरीभाऊ सोनार यांची तक्रार निराधार असून वाहिनीची उभारणी पूर्वीच मंजूर असलेल्या मार्गनकाशानुसार करण्यात येत आहे. तसेच तांत्रिकदृष्टयाही सदर वाहिनी स्थलांतरित करणे शक्य नाही.

वाहिनीची तार ओढल्यानंतर तारेखालील जमिनीचा मोबदला नियमानुसार संबंधितांस देण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रा.जळगावं (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथील शेतकऱ्याला शेतात महापारेषण कंपनीने उभ्या केलेल्या टॉवरचा मोबदला मिळण्याबाबत**

**(४३) १२०६३२ (२८-०७-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रा.जळगावं, (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथील श्री.हरिदास उत्तम वनवे यांच्या शेतामध्ये गट नं.२७८ मध्ये महापारेषण कंपनीने शेतात टॉवर उभे केले असून त्यांचा मोबदला त्यांना अद्यापही मिळालेला नसून यासंदर्भात उपविभागीय अधिकारी ,सिंदखेडराजा यांना वारंवार निवेदने देऊनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-१०-२०१८) :** (१) नाही.
(२) व (३) श्री.हरिदास उत्तम वनवे यांच्या शेतात महापारेषण कंपनीतर्फे १३२ के.व्ही. दुसरबीड-देऊळगावराजा व्दिपथ वाहिनीचा मनोरा क्र. ४६ उभारण्यात आला आहे. मनोरा व

वाहिनीचे काम करीत असतांना झालेल्या पीक व फळ झाडांच्या नुकसान भरपाईची एकूण रक्कम रुपये २,३०,२८६/- त्यांना अदा करण्यात आली आहे. मनोऱ्याखालील जमीनीचा मोबदला देण्याबाबतचा प्रस्ताव उपविभागीय अधिकारी, सिंदखेडराजा यांच्याकडे महापारेषण कंपनीच्या क्षेत्रीय कार्यालयाकडून पाठविण्यात आला आहे. दिनांक २८.०६.२०१८ रोजी उप विभागीय अधिकारी कार्यालय, सिंदखेडराजा येथे मनोरा व्याप्त जमीनीचे मूल्यांकन प्रकरणी समितीची बैठक झाली असून सदर वाहिनीच्या मूल्यांकनाची रक्कम कळविण्यात आल्यानंतर त्यांना महापारेषण कंपनीकडून नियमानुसार मोबदला अदा करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेबाबत**

**(४४) १२०९५९ (२७-०७-२०१८). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पहिली ते दहावी पर्यंतच्या अनुसूचित जमातीच्या १२ लाख विद्यार्थ्यांना दिली जाणारी सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेची जबाबदारी आदिवासी विकास विभाग घेत नसल्याची बाब माहे मार्च, २०१८ मध्ये निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेकरीता विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविल्यावर त्यांच्या खात्यात रक्कम जमा करण्याची कार्यवाही आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत पार पाडली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या शिष्यवृत्तीचा लाभ अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना मिळावा याकरीता शिक्षण विभागाकडुन प्रकल्प कार्यालयाला सहकार्यच केले जात नसल्यामुळे आदिवासी विकास विभाग जबाबदारी घेत नाही, हे ही खरे आहे काय,

(४)असल्यास, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना राज्याच्या आदिवासी विकास विभागाकडुन दिल्या जाणा-या शिष्यवृत्ती योजनेच्या निधीच्या वाटपाचा तपशील व निधीचा केलेला उपयोग याबाबतचा सविस्तर अहवाल शिक्षण विभागाकडुन आदिवासी विकास विभागाकडे सुपूर्द करण्यात आला असून शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१५-१०-२०१८) :** (१), (२) व (३) राज्यातील अनुदानित / विना अनुदानित प्राथमिक, माध्यमिक शाळा, जिल्हा परिषदांच्या शाळा, नगरपालिका व महानगरपालिकांच्या शाळांमध्ये इयत्ता १ ली ते १० वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना सन २०१०-११ पासून सुरु आहे.

सदर योजनेंतर्गत प्रती वर्षाला साधारणत: १२ लाख विद्यार्थ्यांना लाभ देण्यात येत असून यामध्ये साधारणत: ९५% शाळा या जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील असून उर्वरित

शाळा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अखत्यारीतील आहेत. पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज मुख्याध्यापक/शाळा स्तरावर भरण्यात येत असल्याने त्याबाबत विद्यार्थी यादी, त्यांचे बँक खाते इत्यादी तपशील संबंधित शाळांचे मुख्याध्यापक स्तरावर उपलब्ध असते आणि त्यांच्या मार्फत विद्यार्थ्यांचे अर्ज गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केले जातात व तद्नंतर आदिवासी विकास विभागाचा क्षेत्रिय अधिकारी म्हणून प्रकल्प अधिकारी यांच्या मान्यतेने शिष्यवृत्ती वितरीत केली जाते. अशा प्रकारे सर्व तपशील शाळा स्तरावर उपलब्ध असतो व त्यावर संबंधित गटशिक्षणाधिकारी यांचे प्रत्यक्ष नियंत्रण असल्यामुळे व सदरची योजना आदिवासी उपयोजनांतर्गत जिल्हास्तरीय योजना असल्यामुळे सदर योजनेंतर्गतचा निधी जिल्हा परिषद/महानगरपालिका (बृहन्मुंबई) यांच्या शिक्षण विभागामार्फत संबंधित विद्यार्थ्याच्या बँक खात्यावर जमा करण्याकरिता सदर योजना ग्राम विकास विभाग व नगर विकास विभाग यांच्याकडे दिनांक १७.४.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये हस्तांतरीत करण्यात आलेली आहे.

(४) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाची शिष्यवृत्ती वाटप करण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मातापूर (ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर) येथे मंजूर करण्यात आलेल्या १३२ केव्ही दाबाच्या उपकेंद्राच्या काम सुरु करण्याबाबत

**(४५) १२१७५८ (२८-०७-२०१८). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मातापूर (ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर) येथे मंजूर करण्यात आलेल्या १३२ केव्ही उपकेंद्राच्या कामास तात्काळ सुरुवात करण्याबाबत स्थानिक लोकपतिनिधीनी संबंधिताकडे वारंवार मागणी करण्यात येवूनही अदयापी कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, मातापूर येथे १३२ केव्ही दाबाच्या उपकेंद्राच्या कामास लवकरात लवकर सुरुवात करुन काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-१०-२०१८) :** (१) होय.

(२) मौजे मातापूर, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर येथे (वीज भार १२.३ एम.डब्ल्यू) २२० के.व्ही. बाभळेश्वर उपकेंद्रातून ३३ के.व्ही. वाहिनीव्दारे वीज पुरवठा केला जातो. मातापूर हे बाभळेश्वरपासून १७-१८ कि.मी. अतंरावर असल्याने व बाभळेश्वर उपकेंद्रात क्षमता शिल्लक असल्याने मातापूर येथे सद्यस्थितीत वेगळया अतिउच्चदाब उपकेंद्राची आवश्यकता नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तारापुर अणुऊर्जा प्रकल्पात स्थानिक आणि प्रकल्पग्रस्तांऐवजी बाहेरील व्यक्तीना नोकरीत प्राधान्य दिले जात असल्याबाबत

**(४६) १२२८७७ (२८-०७-२०१८). श्री.अमित घोडा (पालघर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भरती प्रक्रियेत स्थानिकांना डावलल्याप्रकरणी तारापुर अणुऊर्जा प्रकल्पाबाहेर दिनांक ५ जुन, २०१८ रोजी वा त्या सुमारास स्थानिक युवकांनी आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक आणि प्रकल्पग्रस्तांऐवजी बाहेरील व्यक्तींना नोकरीत प्राधान्य दिले जात असल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर भरती प्रकियेबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासनाने स्थानिकांना नोकरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-१०-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) तारापूर अणूऊर्जा प्रकल्प हा न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या केंद्र शासनाच्या अणुऊर्जा विभागाचा सार्वजनिक उपक्रम असून केंद्रशासनामार्फत वेळोवेळी भरती संदर्भात निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना यांचे पालन न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. यांच्याकडून केले जाते. सदर प्रकल्पात भरतीसाठी बाहेरील व्यक्तिंना विशेष प्राधान्य देण्याबाबत त्यामध्ये तरतूद नाही. तथापि, प्रकल्पग्रस्तांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी वयोमर्यादा आणि गुणांची टक्केवारी यांत काही विशिष्ट वर्गातील पदांकरिता सवलत देण्यात येते, असे न्युक्लिअर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## देऊळगावराजा (जि.बुलढाणा) येथे टेक्सटाईल पार्क स्थापन करण्याबाबत

**(४७) १२२९०८ (३०-०७-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कापूस उत्पादक क्षेत्रात टेक्सटाईल पार्क स्थापन करण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी नांदगांव पेठ (जि.अमरावती) येथे केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी देऊळगावराजा (जि.बुलढाणा) येथे टेक्सटाईल पार्क मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी वारंवार संबधित विभागाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टेक्सटाईल पार्क मंजूर करुन स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१५-१०-२०१८) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
राज्यातील कापूस उत्पादक क्षेत्रातील बुलढाणा जिल्हयात चिखली येथे टेक्सटाईल पार्क उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे. त्यामुळे बुलढाणा जिल्हयात देऊळगावराजा येथे दुसरे टेक्सटाईल पार्क उभारणे विचारधीन नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सरोळी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथे प्रस्तावित असलेले अतिउच्चदाब (ई.व्ही.एच.) उपकेंद्रास मंजूरी मिळणेबाबत**

**(४८) १२३०३८ (२८-०७-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सरोळी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथे प्रस्तावित असलेले अतिउच्चदाब (ई.व्ही.एच.) २२० के.व्ही. उपकेंद्राचा प्रस्ताव अंतिम मंजूरीसाठी शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अति उच्चदाब विद्युत उपकेंद्रास मान्यता मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ३ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या पत्राद्वारे मा.उर्जा मंत्री यांना विनंती केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, त्या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार विद्युत उपकेंद्रास मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) स्थानिक लोकप्रतिनिधींनी त्यांच्या दि.०३.०२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये सरोळी येथे अति उच्चदाब उपकेंद्र उभारण्याबाबतची मागणी केली आहे, हे खरे आहे.
(३) सरोळी हे ठिकाण २२०/३३ के.व्ही. मुमेवाडी उपकेंद्रापासून अंदाजे १७-१८ कि.मी. अंतरावर असल्याने व मुमेवाडी उपकेंद्रात क्षमता शिल्लक असल्याकारणाने तांत्रिकदृष्टया सरोळी येथे अतिउच्चदाब उपकेंद्र उभारण्याची सद्यस्थितीत आवश्यकता नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा येथे जिल्हा उद्योग केंद्र बांधकाम केलेल्या जागेत सुरु करण्याबाबत**

**(४९) १२३३२४ (०२-०८-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा येथे जिल्हा उद्योग केंद्राला दिनांक ११ ऑगस्ट, १९८० रोजी वा त्यासुमारास ४८० चौ.मीटर क्षेत्रफळावर जागेचे बांधकाम करुन देण्यात आलेली असतांनाही सदर केंद्राचा कारभार भाडयाच्या जागेत सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्हा उद्योग केंद्र त्यांना बांधून दिलेल्या जागेवर सुरु न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर प्रकरणी जिल्हा उद्योग केंद्र मालकीच्या जागेत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१५-१०-२०१८) :** (१) होय.

(२) कार्यालयाची इमारत जीर्ण होऊन पडल्यामुळे कारभार करणे अशक्य होते.

(३) सदर प्रकरणी उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. जिउकें-२०१२/ प्र.क्र.४९६/उद्योग-७, दि. २३/०२/२०१८ अन्वये रू. १,३८,८८,३७८/- (रू. एक कोटी अडतीस लाख अठ्याऐंशी हजार तीनशे अठ्याहत्तर फक्त) इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिलेली असून त्यापैकी ८०% रू. १,२०,००,०००/- (रू. एक कोटी वीस लाख फक्त) एवढा निधी २०१७-१८ मध्ये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग बुलढाणा यांना वितरीत करण्यात आलेला आहे.

(४) बांधकामाबाबत कार्यवाही सुरू आहे.

---

**भुसावळ (जि.जळगांव) तालुक्यातील दीपनगर विद्युत प्रकल्पातील नवीन ६६० मेगावॅट प्रकल्प उभारण्याचे काम प्रलंबित असल्याबाबत.**

**(५०) १२३५५४ (२८-०७-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगांव) तालुक्यातील दीपनगर विद्युत प्रकल्पातील नवीन ६६० मेगावॅट प्रकल्प उभारण्याचे काम प्रलंबित असल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र संच क्र. ६ (६६० मे.वॅ.) ह्या ईपीसी प्रकल्पासाठीचे पुरवठा, उभारणी आणि स्थापत्य कामांचे आदेश महानिर्मिती कंपनीने दि. १७.०१.२०१८ रोजी मे.बी.एच.ई.एल. कंपनीला दिले होते. परंतु वीज नियामक आयोगाने निर्देशित केलेल्या काही बाबींमुळे मे.बी.एच.ई.एल. कंपनीस काम सुरु करण्याची परवानगी देण्यात आली नव्हती. सदर प्रकल्पासाठी राज्य वीज नियामक आयोगाच्या दि.०१.०८.२०१८ च्या आदेशानुसार परवानगी मिळाली आहे. त्यानुसार महानिर्मिती कंपनीने दि. ०६.०८.२०१८ रोजी मे.बी.एच. ई. एल. कंपनीला काम सुरु करण्याची परवानगी (Notice to Proceed) दिली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**मुंबई.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.